# ग्रामपंचायत कार्यालय मांडवा

## ई-निविदा सूचना क्र.१ (पहिली वेळ)

## तेंदू पत्ता संकलन सन २०२६

================================================================================

ग्रामसभा (पूर्ण) ग्रामपंचायत मांडवा ता. घाटंजी जि. यवतमाळ अंतर्गत बाबत दोन लिफाफा पद्धतीने ई- निविदा शासनाचे वर्गीकारणी निविदा मागविण्यात येत आहे. कामाची निविदा ई- निविदा पद्धतीने सदर करावयाची आहे. निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाचे **www.mahatenders.gov.in**या संकेत स्थळावर सविस्तर दि १८/०५/२०२६ पासून उपलब्ध आहे.

| अ.क्र | नाव | निविदेत घ्यावाचे प्रती, परिणाम नुसार दर | निविदा प्रपत्रची किमत | कंत्राटदराचा वर्ग | कालावधी | अनामत जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरवी तेंदू पाने संकलन रॉयल्टी रकमे करीता | प्रती गोनी चे दर | १००० | योग्य त्या वर्गातील (वन विभागा मार्फत गौण वनोपज – तेंदूपाने बाबत अधिकृत रीत्या नोंदणीकृत परवानाधारक. | मे – २०२६ पर्यंत | 2००० रु. |

ई-निविदा पध्दटीचा तपशील-

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिद्धी दिनांक | दिनांक. १८/०५/२०२६ |
| २ | ई-निविदा दस्ताएवज डाऊनलोड प्रारंभ दिनांक | दिनांक. १८/०५/२०२६ |
| ३ | दस्ताएवज डाऊनलोड डाऊनलोड समाप्त दिनांक | दिनांक. २१/०५/२०२६ |
| ४ | ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दिनांक. १८/०५/२०२६ |
| ५ | ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक. २३/०५/२०२६ |
| ६ | ई- निविदा प्रपत्र फी, इसारा रक्कम, दस्तऐवज, हे (धनादेश डी.डी/एफ.डी.आर/७ पावती) माध्यमाने सादर करावीत व दस्तऐवज कागदपत्रे कार्यालयात सदर करावयाचा अंतिम दिनांक. | दिनांक. २३/०५/२०२६ |
| ७ | ऑनलाईन ई-निविदा उघडन्याची (शक्यतो) दिनांक वेळ | दिनांक. २५/०५/२०२६ |

सर्व सबंधित विवरणपत्र, कामाचे विनिर्देश शर्ती व अटी आदि दिनांक. १८/०५/२०२६ पासून महाराष्ट्र शासनाच्या **www.mahatenders.gov.in**या संकेत स्थळावर सविस्तर पहावयास मिळतील ई-निविदेत अटीं,शर्तीना अधीन राहून इच्छुक पुरवठा धारकांनी आपल्या निविदा विहित मुदतीत सादर कराव्यात.

सचिव
ग्रामपंचायत मांडवा

सरपंच
ग्रामपंचायत मांडवा

## तेंदू हंगाम २०२६ करीता निवीदा फॉर्म

फॉर्म कमांक .–

निवीदाधारकाचे दुरध्वनी/मोबाईल कमांक ........................................................................

ई–मेल आयडी ........................................................................

व्दारा,

मे/श्री ........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

(परवानाधारकाचे पूर्ण नाव व पत्ता नमूद करावा)

प्रति,

मा.सचिव/सरपंच
ग्रामपंचायत मांडवा ता. घाटंजी .जि. यवतमाळ

**महोदय/महोदया,**

१)पंचायत क्षेत्र (अनुसुचित क्षेत्र) विस्तार कायदा १९९६ (पेसा) नियम ४ मार्च २०१४ अंतर्गत ग्रामसभेला गौण वनोपज बाबत संकलन,व्यवस्थापन,विक्री व विल्हेवाट बाबत चे सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत,प्रमाणे त्या गावातील हिरवी तेंदूपाने महाराष्ट्र शासनाने / ग्रामसभेने निर्धारित केलेल्या मजुरी दरा नुसार संकलन करणे व संकलित तेंदू पुडा नुसार रॉयल्ट्री रकमे करीता विक्री साठी निवीदा आमंत्रीत केलेली आहे.

२)त्यानुसार मी/आम्ही त्या गावातील घोषित उत्पादनापर्यंत केलेली हिरवी तेंदूपाने महाराष्ट्र शासनाने / ग्रामसभेने निर्धारित केलेल्या मजुरी दरा नुसार संकलन करणे करीता व तेंदू पुडा संकलन मजुरी रक्कम वगळून संकलित तेंदू पुडा नुसार रॉयल्ट्री रकमे करीता या नियमा नुसार तेंदू पाने खरेदी करण्यासाठी करारनाम्या मधील अटी व शर्तीचे अधीन राहून (मान्य/स्वीकारून) निवीदा भरणा करीत आहे. या अनुषंगाने मी/आम्ही खालीलप्रमाणे नमूद बोली देत आहे/आहोत.

| ग्रामपंचायत चे नाव | गावाचे नाव | घोषित उत्पादन प्रमाण गोणी (अंदाजे) | ऑफर दिलेली रॉयल्ट्री रक्कम रु. (अक्षरी) प्रति प्रमाण गोणी करीता | ऑफर रक्कम आकडयामध्ये नमूद करावी. (देय करांची रक्कम वगळून) |
|---|---|---|---|---|
| मांडवा | मांडवा | 1 | ८०० | |

3) मी/आम्ही वर नमूद घोषित उत्पादनापेक्षा अधिक कमाल मर्यादा घोषित उत्पादनापेक्षा 25% पर्यंत परिमाणासाठी दिलेल्या ऑफर रकमेच्या प्रति प्रमाण गोणी सममूल्या प्रमाणे रक्कम ग्रामसभेला अदा करुन अधिकची गोळा होणारी तेंदूपाने खरेदी करण्यास सहमत आहे/आहोत.

4)या निविदा संबंधीचे दस्ताऐवज स्कॅन केलेल्या स्वरूपात विहित मुदतीत ई–निविदासोबत सादर करणे बंधनकारक राहील. तसेच प्रमाणपत्र नोंदणी GST Certificate, PAN कार्ड व Income Tax Certificate व इतर दस्तच्या साक्षांकीत प्रती. निविदा लिफापा क्रमांक 2 मध्ये –फक्त निविदा दर पत्रक सादर करावे.

5) मी/आम्ही स्विकार करतो की सादर केलेली ऑफर ग्रामसभेने दिनांक ......./ / पर्यंत ऑफर स्विकारण्यासंदर्भात निर्णय कळविल्यावरच ग्रामसभेसोबत करारनामा करण्यांत येईल. तथापि दिनांक ......./ / नंतर दिलेली ऑफर निरस्त होईल, हे मी/आम्ही मान्य करतो.

6) ग्रामसभेसोबत केलेल्या करारानाम्याच्या अटी व शर्तीला अधिन राहूनच मी/आम्ही हिरवी तेंदूपाने महाराष्ट्र शासनाने / ग्रामसभेने निर्धारित केलेल्या मजुरी दरा नुसार संकलन करणे व पुडा संकलन मजुरी रक्कम वगळून संकलित तेंदू पुडा नुसार रॉयल्ट्री रकमे करीता या नियमा नुसार तेंदू पाने खरेदीसाठी दिलेली ऑफर स्विकार्य राहिल, हे मान्य करतोय.तसेच महत्तम (सर्वात जास्त ) दाराची प्राप्त झाली परंतु सदरील निविदा – हि निविदा सुचणे मधील अटी शर्तीची पूर्तता आणि करारनाम्या मधील अटी शर्तीची पूर्तता केलेली नसेल अर्थातच अपूर्ण निविदा असेल तर सदरील निविदा नामंजूर करून त्या नंतरची प्राप्त निविदा मंजूर करून सबंधित निविदाधारका सोबत विहित अटीशर्ती सह करारनामा करण्यात येईल. तसेच ई निविदे मध्ये प्रथम वेळी ग्रामसभा तथा ग्रामपंचायतिला समाधानकारक दर असलेली निविदा प्राप्त न झाल्यास ग्रामसभा तथा ग्रामपंचायत द्वितीय व तृतीय वेळेस विहित नियमा नुसार ई निविदा आमंत्रित करेल, हे आम्ही मान्य करतोय.

7) मी/आम्ही निवीदा भरण्या अगोदर ग्रामसभेने आमंत्रित केलेल्या निवीदा भरण्यास आर्थिक रित्या सक्षम आहे/आहोत याची खात्री केलेली आहे. तसेच भारतीय दंड संहिते नुसार कोणत्याही नैतिक अधःपतन, नादारी, थकबाकीदार, फौजदारी गुन्हयात अपराधी म्हणून न्यायालयाने शिक्षा ठोठावलेली नाही.

8) निवीदा भरण्या अगोदर निवीदा अटि व शर्ती, करारनाम्यातील अटि व शर्ती समजून घेतलेल्या असून कराराच्या जोखीम,जबाबदारी,लाभ व हानी याबाबत पूर्ण खात्री केलेली आहे. तसेच सबंधित ग्रामसभा / ग्रामपंचायतचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील हे आम्ही मान्य करतोय.

9) निवीदा भरतांना सादर केलेली संपूर्ण माहिती ही माझे/आमचे माहिती प्रमाणे पुर्ण सत्य आहे व भविष्यात सादर केलेली माहिती खोटी व बनावटी आढळल्यास माझे/आमचे विरुध्द कायदयाप्रमाणे दंडात्मक कारवाईस पात्र राहू व करार भंग करण्यास व त्यामुळे होणा–या हानीसाठी देखील जबाबदार राहीन/राहू.

10) नाव व पत्ता व्यक्ती/प्रोपरायटर/हिंदु अविभक्त परिवार/भागीदारी फर्मचे सर्व भागीदाराचे वतीने/ कंपनी कायदा, 1956 व कंपनी कायदा, 2013 अंतर्गत नोंदणी केलेल्या मर्यादित कंपनी च्या सचिव, संचालक किंवा कार्यकारी संचालक यांचे सही व शिक्क्याने

स्वाक्षरी–
स्वाक्षरी कर्ताचे नांव –
पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता–

भागीदारी फर्म असल्यास फर्म चे *Partnership Deed*

नोंदणीकृत मर्यादित कंपनी चे Memorandum of Association & Article of Association च्या स्वाक्षांकीत छायाप्रती रक्कमेच्या डिमांड ड्राप्ट सह संलग्न कराण्यात येत आहे.

11) मी/आम्ही खालील प्रमाणे घोषणा करतो की,

अ) मी/आम्ही राज्यशासन, स्वराज्य संस्था, बॅंकाचे थकबाकीदार नाहीत. तसेच न्यायालयापुढे नादारी असल्याचे घोषीत नाही.

ब) मी/आम्ही Indian Contract Act, 1872नुसार करार करण्यास सक्षम व्यक्ती/संस्था/कंपनी आहोत.

क) मी/आम्ही आमच्या वतीने निवीदा भरणे, करारनामा करण्यासाठी सक्षम असल्याचे General/Special Power of Attorney धारक आहे.

ड) मी/आमचे खालील दस्ताऐवजांच्या स्वयंस्वाक्षांकीत छायाप्रत संलग्न केलेले आहे.

वन विभागाकडे केलेले तेंदूपाने निर्यातक/कारखानदाराचे वर्ष २०१९ चे नोंदणी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, ITR सन.२०१५/१६/१७, GP नाहरकत प्रमाणपत्र.,विधीमान्य महाराष्ट्र शासनाचे चे GST (व्वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र) प्रमाणपत्र,

१२) संकलनकर्ता मजूरदार तेंदूपत्ता संकलन करते वेळी कोणत्याही वन्य प्राण्याकडून जीवितहानी अथवा अपघात झाल्यास ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही

दिनांक

आपला विश्वासू

स्थळ

निवीदाधारकाची / परावानाधाराकाची स्वाक्षरी

नाव व हुद्दा

# करारनामा

पंचायत क्षेत्र (अनुसूचित क्षेत्र) विस्तार अधिनियम १९९६ (पेसा), अंतर्गत असलेल्या ग्रामसभांना प्राप्त अधिकारा नुसार -

संदर्भ -

- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब/क्र/पीआरआय.२०१०/प्र.क्र १३० / पं .रा -२/ग्रामविकास व जलसंधारण विभाग /अधिसूचना/दिनांक -०४/०३/२०१४,
- महाराष्ट्र शासन निर्णय/क्र:पेसा-२०१२/प्र.क्र.६५/पंरा-२/ग्राम विकास विभाग/दिनांक - १९/०१/२०१५, दिनांक-१६/०२/२०१५, आणि दिनांक-१७/१२/२०१७.
- तेंदू पाने संकलन,व्यवस्थापन,विक्री व विल्हेवाट बाबतचा पर्याय क्र.२ निवड व या अनुषंगाने तेंदू पाने संकलन,व्यवस्थापन,विक्री व विल्हेवाट बाबत ई निविदा प्रक्रीयेचा अवलंब करून ई निविदे मध्ये अधिक दर प्राप्त ई निविदा मंजूर करणे बाबत चा ग्रामसभा ठराव दिनांक - / /2026

वरील शासन निर्णया मधील विहित तरतुदी व ग्रामसभा ठरवा नुसार तेंदू हंगाम 2026 करीता ग्रामसभांनी स्वतः तेंदूपाने संकलन,व्यवस्थापन,विक्री व विल्हेवाट करण्याबाबत चा निर्णय / ग्रामसभा ठराव (पर्याय क्र.२.) घेतला आहे. या नुसार सदरील ग्रामसभांच्या अंतर्गत असलेल्या तेंदूपानांचा झालेल्या ई टेंडर / ई निविदा नुसार महत्तम ई निविदा सादर केलेल्या परवानाधारकाची निविदा ग्रामसभा / ग्रामपंचायत द्वारा मंजूर करून, उपरोक्त शासन निर्णय व नियमांना अधिन राहून खालील अटी व शर्ती नुसार सबंधित परवानाधारका सोबत करारनामा करण्यात येत आहे,

सदरहू करारनामा हा दिनांक.- / / रोजी एकीकडे अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा -------------------------------ग्रामपंचायत / गट ग्रामपंचायत ----------------------------(त्याचे सरपंच – सचिव यांचे समावेश होतो) आणि श्री.------------------------------------------------------------------ रा.------------------------पोस्ट ---------------------------------तालुका ------------------------ जिल्हा -------------------------,मे.-------------------------------------------------------------------------------------------------या नावाने मौजा -------------------------------येथे कंपनी कायदा १९५६ (I of 1956 ) /भारतीय कंपनी कायदा १९१३ (VII of 1913) नुसार नोंदणीकृत आणि व्यवसाय चालवीत असलेले कंत्राटदार /परवानाधारक (शासनाचे सबंधित विभागा मार्फत रजिस्टर्ड असलेली कंपणी ) ज्यांचा इनकम टक्स कायदा १९६१ च्या कलम १३९ – अ पोट कलम ४ नुसार स्थायी लेखा क्रमांक (P.A.N. )----------------------------दिनांक.- / / आहे, (या पुढे यांना परवानाधारक /कंत्राटदार असे संबोधिले आहे,व ज्यात ते स्वतः त्यांचे वारस, कार्यचालक,मुखत्यार,ई.चा समावेश होतो.) यांच्या या करारनाम्या मध्ये समावेश करण्यात आलेला आहे,

ज्या अर्थी वरील ग्रामसभा ----------------------------- /ग्रामपंचायत/गट ग्रामपंचायत --------------------------------------यांना पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ (पेसा) अंतर्गत गौण

वनोपजा बाबतचे सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत, आणि त्या अर्थी तेंदू हंगाम 2026 करीता झालेल्या ई टेंडर / ई निविदा नुसार उपरोक्त परवानाधारकाने / कंत्राटदाराने महत्तम ई निविदा सादर करून तेंदू संकलन केंद्रावर सन 2026 च्या तेंदू हंगामात हिरवे तेंदू पाने गोळा / संकलन करण्याचे अधिकार प्राप्त केलेले आहेत,

नियम व अटी ;-

अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) ग्रामसभेच्या क्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या परिसरातील भागात उत्पादन होणारे गौण वनउपज मध्ये येणाऱ्या तेंदूपाने बाबत राज्य शासनाचे सबंधित विभागा मार्फत निर्धारित केलेल्या दराला अधिन राहून खालिल प्रमाणे असलेले नियम व अटी उभयता पक्षांना लागू राहतील,

१) तेंदू पानांचा एक पुडा हा बिडी बनविण्या योग्य ७० पानांचा राहील,

२) एक हजार पुडे म्हणजे एक प्रमाण गोणी राहील,

३) महाराष्ट्र सरकारने वर्ष 2026 तेंदू हंगामासाठी निर्धारित केलेले मजुरीचे दर १००० (एक हजार) पुड्यां करीता 3000 रुपये ( म्हणजेच शंभर (१००) पुड्यांचा दर एकशे चौऱ्याशी रुपये पन्नास पैसे राहील ) मजुरीची रक्कम ४८ तासाच्या आत (२ दिवसात) परवानाधारकाने / कंत्राटदाराने सबंधित मजुरांना अदा करण्यात यावी,व ग्रामसभांना / ग्रामपंचायतींनां पावती ध्यावी घ्यावी, मजुरांना द्यावी लागणारी शासन दर प्रमाणे मजुरीची रक्कम कंत्राटदारानेच/ परवानाधारकानेच देणे बंधनकारक राहील,व त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची/ परवानाधारकाची राहील,

४) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेच्या क्षेत्राअंतर्गत असलेल्या एका तेंदू पुड्याचा दर परवानाधारकाने / कंत्राटदाराने महत्तम ई निविदा सादर केलेल्या दरा प्रमाणे एकूण तेंदू पुडे संकलनानुसार जी रक्कम होईल ती स्वामित्व शुल्क स्वरूपा (रॉयल्टी रक्कम) मध्ये भरणा करावि लागेल, व ग्रामसभेशी अपेक्षित असलेल्या तेंदू पुड्यांची जी स्वामित्व शुल्काची किमत निघेल त्या किमतीच्या १०% रक्कम हि कंत्राट मिळाल्या पासून सात दिवसाच्या आत ग्रामसभेच्या - ग्रामसभा कोष खात्या मध्ये धनादेश/आर.टी.जी.एस./डी.डी. द्वारे भरणा करणे बंधन कारक राहील, व उर्वरित ९०% रक्कम हि शासनाच्या सबंधित विभगा च्या नियमा नुसार किंवा ग्रामसभेच्या खालिल नियमा नुसार -

प्रथम किस्त ३०% रक्कम दिनांक- – १ सप्टेबर 2026 (सुट्टीचा दिवस असल्यास दुसऱ्या दिवशी),

द्वितीय किस्त ३०% रक्कम दिनांक- १ ऑक्टोंबर 2026 (सुट्टीचा दिवस असल्यास दुसऱ्या दिवशी),

तृतीय किस्त ३०% रक्कम दिनांक- १ नोव्हेंबर 2026 (सुट्टीचा दिवस असल्यास दुसऱ्या दिवशी)

या प्रमाणे ग्रामसभेच्या ग्रामसभा कोष खात्या मध्ये धनादेश/आर.टी.जी.एस./डी.डी. द्वारे भरणा करणे परवानाधारकास / कंत्राटदारास बंधन कारक राहील,

उपरोक्त दिलेल्या तारखेस परवानाधारकाने / कंत्राटदाराने स्वामित्व शुल्क भरणा न केल्यास त्यांना त्या रकमे वर २० % दराने दर साल दर शेकडा पद्धतीने व्याज आकारण्यात येईल, व ते करारनाम्या नुसार भरने बंधनकारक राहील,

५) परवानाधारकाने / कंत्राटदाराने तेंदू पाने संकलन केंद्रावर / फळीवर संकलित करून त्या वरील प्रक्रिया पूर्ण करून त्यांना ज्या गोदामा मध्ये तेंदू पाने (तेंदू पुडे) साठविण्याचे असेल ते गोदाम तेंदूपाने बोद (गोणी) साठविण्यास योग्य आहे किंवा नाही ते ग्रामसभेचे /ग्रामपंचायतचे सरपंच / सचिव हे गोदामाचे परीक्षण करून ते गोदाम योग्य असल्या बाबतचे गोदाम मंजुरीचे पत्र प्राप्त झाल्या नंतरच सदरहू ग्रामसभा तेंदू पाने संकलन केंद्रापासून ते त्या गोदामा पर्यंत नेन्याची परवानगी - वाहतूक परवाना देईल,

६) परवानाधारकास / कंत्राटदारास दिलेल्या तारखेस स्वामित्व शुल्काचा जसा जसा भरणा करेल त्या त्या प्रमाणात तेंदू पाने गोदामातून तितक्याच प्रमाणात निकाशीची (निर्गत) करण्याची परवानगी परप्रांतात किंवा परवानाधारक / कंत्राटधारक मागणी करेल त्या ठिकाणपर्यंतचा – वाहतूकपरवाना परावानाधाराकास / कंत्राटदारास ग्रामसभे मार्फत किंवा सबंधित शासनाच्या विभागाकडून जारी करण्यात येईल,

७) ग्रामसभे कडून रोजचे रोज हस्तांतरित झालेली हिरवे तेंदू पाने एकदा हस्तांतरित झाल्यावर तेंदू पानांची सुरक्षा,देखभाल व वाहतुकीची सर्वस्व जोखीम व जबाबदारी हि परवानाधारकाची / खरेदीदाराची राहील.

८) सदरील पेसा गावात कुऱ्हाड बंदी असून वनात फुटवे छटाईस मनाई आहे.

९) तेंदू पाने संकलन करतांना संकलनकर्ता मजुरा वर प्राण्यां पासून काही इजा झाल्यास किंवा जीवित हानी झाल्यास त्याची जबाबदारी ही ग्रामसभेची,परवानाधारकाची राहणार नाही,या बाबतची सर्वस्वी जबादारी सबंधित मजुरांची असेल,

१०) वनात आग लागू नये या साठी आवश्यक दक्षता घेणे गरजेचे आहे व त्यास निविदाधारकानी पुरेपूर मदत करावी, वनक्षेत्रात आग लागणार नाही/लागल्यास विझविण्याकरिता सहकार्य करावे,

११) तेंदूपाने हस्तांतराना दरम्यान आग,वादळ,पाउसा मुळे होणारे नुकसान हे निविदाधारक यांना सहन करावे लागेल,या नुकसानीची कोणतीही जबाबदारी ग्रामसभेची / ग्रामपंचायत ची राहणार नाही,

१२) अक्समिक नैसर्गिक संकटामुळे होणाऱ्या नुकसानी करीता निविदाधारकास कोणतीही भरपाई ग्रामसभे कडून / ग्रामपंचायत कडून मागण्याचा अधिकार राहणार नाही,किंवा ती दिली जाणार नाही.

१३) संकलित केली जाणारी तेंदूपाने सुकविणे चट्टे लावणे पाणी शिंपडणे,गोण्या भाराने व वाहतूक करण्या साठी लागणार सर्व खर्च तथा इतर अनुशांगिक बाबी साठी लागणारा सर्व खर्च परवानाधारकांनी तथा निविदाधाराकाना करावा लागेल या साठी किंवा इतर कोणत्याही बाबी साठी ग्रामसभा / ग्रामपंचायत कोणताही निधी देणार नाही.

१४) परवानाधारक यांना विकत घेतलेल्या तेंदू पाना करीता वर्तमान स्थिती मध्ये अनुज्ञेय असलेल्या दर प्रमाणे मुली वर्धित दर, वस्तू व सेवा कर (GST) उत्पनाच्या स्त्रोतावर आयकर (TDS) भरणा करणे आवश्यक राहील तसेच शासनाच्या वेळोवेळी कर सुधारणे नुसार त्या वेळी अनुज्ञेय असणाऱ्या करांचा भरणा करणे बंधन कारक राहील,

१५) करारनामा राबविताना कोणतेही बेकायदेशीर कृत्य,वाममार्गाचा उपयोग होत असल्यास व नैसर्गिक न्यायाच्या उल्लंघनाची घटना होत असल्याचे आढळून आल्यास निविदा धारक स्वतः जबाबदार राहतील,

१६) वनसंपदेचा उपयोग घेण्याचा हक्क/ अधिकार हे पेसा कायद्याने ग्रामसभेस असल्याने वनसंपदा नष्ट करणे अवैध वृक्ष तोड,आगी लागणे /लावणे किंवा वन्यजीवांची हत्या करणे आदी बेकायदेशीर कृत्य पूर्णतः निषिद्ध आहेत,कोणतेही बेकायदेशीर कृत्य निदर्शनास आल्यास दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार ग्रामसभेस राहतील तथा विहित कायद्या नुसार कार्यवाही केल्या जाईल .

१७) Indian Contract Act, 1872 नुसार करार करण्यास सक्षम व्यक्ती /हिंदू अभिव्यक्ती परिवार /संस्था/कंपणी/असल्याचे विधीग्राह्य दस्तावेज सलग्न करावेत, The Companies Act,1956/The Companies Act,2013 नोंदणी प्रमाणपत्र

PAN Card] Address Proof, Aadhar Card, Maharashtra GST Registration, Power of Attorney, Memorandum & Article of Association of company, CIN Registration with RoC बाबतचे विधीग्राह्य दस्तावेज सलग्न करावेत,

१८) करारनाम्याचा कालावधी हा कालावधी हा दिनांका पासून ३१ डिसेंबर 2026 पर्यंतचा राहील.

१९) करारनामा अटी शर्तीचे उल्लंघन केल्यास प्रती दिवस २०० /- दरा नुसार ग्रामसभा उल्लंघन कालावधी साठी दंड आकारेल व निविदा धारकाने करारनाम्या प्रमाणे काम न केल्यास सुरक्षा ठेव रक्कम व अनामत रक्कम जप्त करून त्यांचे जोखीम व जबाबदारी वर फेर विक्री करण्यात येईल. व ग्रामसभेला होणाऱ्या नुकसानी साठी मूळ निविदाधारक यांची जबाबदारी निर्धारित करून आवश्यक वसुली करण्यात येईल.

२०) वरील विषयाच्या अनुषंगाने संदर्भीय शासन निर्णया मध्ये नमूद मा.जिल्हाधिकारी साहेब यांचे अध्यक्षते खालील जिल्हास्तरीय तक्रार मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती हे विहित नियम नुसार मार्गदर्शन करेल.

२१) वरील नियम,अटी व शर्तीचे बदल /सुधारणा करण्याचे करण्याचे अधिकार ग्रामसभा / ग्रामपंचायत यांना राहतील.

दिनांक :-

स्थळ :-

करारनामा करणाऱ्याची (परवानाधारकाची) स्वाक्षरी ----------------------------------

नाव व हुद्दा

करारनामा लिहून घेणाऱ्याची स्वाक्षरी

नाव व हुद्दा

सरपंच सचिव

ग्रामसभा--------------------ग्रामपंचायत--------------------------

सही - साक्षिदार क्र.१ -------------------------------- ही - साक्षिदार क्र.२ -------------------------------

Signature Not Verified

Digitally signed by Puja Vikram Todasam
Date: 2026.05.18 13:20:27 IST
Location: Maharashtra-MH